# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २३१-२३** **दिनांक :- २५/०७/२०२३**

## घरफोडी चोरी व प्लास्टीक दाना चोरी करणा-या आरोपींना पकडून त्यांचेकडून ९,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांची कामगिरी.

-------00000-------

दिनांक २३/०७/२०२३ रोजी ०१.३० वा. ते ०५.३० वा. च्या दरम्यान राजेश्वर मेडिकलच्या मागे, नालेश्वरनगर, विरार फाटा, ता.वसई, जि.पालघर येथे फिर्यादी औरंगजेब मनिहार, वय २७ वर्षे हे त्यांचे घरामध्ये झोपले असतांना त्यांच्या घरात कोणीतरी अज्ञात चोरटयाने प्रवेश करुन फिर्यादी यांचे संमतीशिवाय स्वतःच्या फायदयाकरीता १,२७,७००/- रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागीने चोरी करुन नेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मांडवी पोलीस ठाणेत गुन्हा रजि नंबर १८४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८० प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिन्यापासुन चोरी व घरफोडी चोरी गुन्हयांच्या प्रमाणात वाढ झाल्याने सदर गुन्हयांना आळा घालून दाखल गुन्हयांची उकल करण्याकरीता वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने गुन्हे शाखा, कक्ष ३, विरार वर नमूद गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना तांत्रीक विश्लेषण व आरोपीत बाबत मिळालेल्या गोपनीय माहितीवरून आरोपीत नामे १) अमिन अब्दुल रज्जाक शेख, वय २६ वर्षे, रा. कन्हेर, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर. २) प्रफुल्ल संग्राम गायकवाड, वय ३२ वर्षे, रा. कन्हेर, विरार पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांना दिनांक २५/०७/२०२३ रोजी ताब्यात घेवुन त्यांचेकडुन गुन्हयातील १,१०,७००/- रुपये किंमतीचे सोन्याचे व चांदीचे दागीने व इतर मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पुढील कारवाई करीता मांडवी पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

अटक आरोपीत हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार असून त्यांचेविरुध्द घरफोडी, रिक्षा चोरीसारखे १० पेक्षा जास्त गुन्हे रत्नागिरी, मुंबई शहर, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाण्यात दाखल आहेत.

तसेच दिनांक २४/०७/२०२३ रोजी रात्री ०८.०० वाजता ते दिनांक २५/०७/२०२३ रोजी सकाळी ०९.३० वाजताचे सुमारास गाळा नं ६३, चॅम्पियन कंम्पाउंड, चौधरी वजन काटा जवळ, नालासोपारा पुर्व येथे फिर्यादी नामे पारसमल मोहनलाल जैन, वय ५५ वर्ष यांच्या कंपनीतील काम करणा-या इसमाने कंपनीतुन २,१६,०००/- रुपये किंमतीच्या मालाची सहमतीशिवाय लबाडीने चोरी केल्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पेल्हार पोलीस ठाणेत गुन्हा रजि नंबर ६९१/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८१, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा गुन्हे शाखा, कक्ष ३, विरार समांतर तपास करीत असतांना आरोपीत नामे जितु शंभु सोनी, वय ३५ वर्षे, रा. पेल्हार, ता. वसई, जि. पालघर यास दिनांक २५/०७/२०२३ रोजी गुन्हयातील मुद्देमाल व गुन्हा करणे करीता वापरलेले वाहन अशा एकूण ७,८९,३००/- रुपये किंमतीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असून त्यास पुढील कारवाई करीता पेल्हार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. उमेश भागवत, पोहवा. अशोक पाटील, मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अं.राकेश पवार, सुमित जाधव, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे म.सु.ब. सागर सोनवणे, गणेश यादव सर्व नेमणुक गुन्हे शाखा, कक्ष ३ तसेच सफौ. संतोष चव्हाण नेम. सायबर सेल यांनी केलेली आहे.



---ooo---